दाखल दिनांक : २९.१२.२०१२

नोंदविल्याचा दिनांक : २९.१२.२०१२

निकाल दिनांक : ०४.०५.२०२६

कालावधी : १३व.०४म.०६दि

## न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१, पाथर्डी यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी – रविकिरण सपाटे)

**नियमित फौजदारी खटला क्र. ५२६/२०१२** **निशाणी क्रमांक – ६३**

गुन्हा नोंद क्र.३२१/२०१२, पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र शासन,**
मार्फत – पोलीस निरीक्षक,
पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

प्रतिनिधीत्व : सहाय्यक सरकारी वकील श्रीमती.ए. बी. कुलकर्णी.

**आरोपी** **गणेश दिलीप लोहे,**
वय –३३ वर्ष, धंदा – मजुरी,
रा. पराग हॉटेल जवळ, नाथनगर, पाथर्डी
ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

प्रतिनिधीत्व : विधीज्ञ श्री. एन.बी. जायभाये.

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २९.०९.२०१२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २९.०९.२०१२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २९.१२.२०१२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०१.०९.२०१८ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ३०.०७.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | -- |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश दिलीप लोहे | २९.०९.२०१२ | ३०.०९.२०१२ | भा.दं.वि.क. ३२४,३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# न्यायनिर्णय
## (पारित दिनांक ०४ मे, २०२६)

१. आरोपीविरुध्द पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं.३२१/२०१२ भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ खालील गुन्हयांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण १९ अन्वये वॉरंट खटल्याप्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी की**,

फिर्यादी बाबासाहेब म्हातारदेव कोलथे यांनी दिनांक २९.०९.२०१२ रोजी पोलिस स्टेशन पाथर्डी येथे फिर्याद दिली की, दि. २९.०९.२०१२ रोजी दुपारी ३.३० वाजताचे सुमारास ते पाथर्डी शहरातील कोर्टासमोरील शनि देवाचे मंदीरासमोर सार्वजनिक पाण्याचे टाकीवर पाणी पिण्यासाठी गेले असता तेथे आरोपी गणेश दोन तीन

लोकांना पाणी पिवू देत नव्हता. फिर्यादीला जास्त तहान लागल्यामुळे ते पाणी पिण्यासाठी गेले असता आरोपी आला व त्याने फिर्यादीचे दंडाला धरुन मागे ओढले. फिर्यादीने त्यास मला पाणी पिवू दे, मला फार तहान लागली आहे असे सांगत असताना आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करणेस सुरुवात केली तसेच फाईटने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादी पळण्याच्या प्रयत्नात असताना आरोपीने त्यांना हाताला व कमरेला धरुन वर उचलून जोरात खाली आपटले. त्यामुळे फिर्यादी तोंडावर व गुडघ्यावर पालथे पडले व त्यामुळे गोटया दगडांचा त्यांचे डोक्यात, कपाळावर, गालावर, डावे डोळयाचे खाली तसेच दोन्ही गुडघ्यांवर व ठिकठिकाणी शरीरावर मार लागला. ते ओरडु लागल्याने त्यांचे मित्र अरुण, आदिनाथ, भाउसाहेब, विजय व इतर लोक जमा झाले व त्यांनी सोडवासोडव केली. आरोपीने जाताना आता वाचलास परत जिवंत सोडणार नाही असा दम देवून निघून गेला.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पाथर्डी पोलीस ठाणे गु.र.नं. ३२१/२०१२, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास स. फौ. एस. डी. साळवे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा तयार केला व जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.११ कडे दोषारोप ठेवला आहे. दोषारोपातील मजकुर आरोपीस त्याच्या भाषेत वाचून दाखविला असता, आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षा घेण्याची मागणी केली.

५. तसेच, आरोपीचे फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३१३(१) (ब) चे निवेदन नि. क्र. ६१ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

६. खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले.

त्यांचे निष्कर्ष मी खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २९.०९.२०१२ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास मौजे पाथर्डी शहरातील शनि मंदीराजवळील सार्वजनिक पाण्याच्या टाकीवर ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथे आरोपीने फिर्यादीस प्राणघातक हत्याराने इच्छापूर्वक दुखापत केली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| २. | वर नमुद वेळेस व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत किंवा इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचवली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा फौजदारीपात्र गुन्हा घडावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन अपमानित केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केला व जिवे मारण्याची धमकी दिली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– का र ण मि मां सा –:**

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता –**

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्याने विवेचन व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्रीत करण्यात येत आहे.

८. सा.क्र.१ दिनकर रामचंद्र झिंजुर्डे, घटनास्थळ पंच यांनी सरतपासात

अभिकथन केले आहे की, दि.३०.०९.२०१२ रोजी त्यांना पोलिसांनी शनिमंदीराजवळ पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. त्यांच्या गाडया तेथे उभ्या असल्यामुळे ते तेथे उभे होते. पोलिसांनी कशाचा पंचनामा केला व त्यात काय मजकूर लिहिला हे त्यांना माहित नव्हते. त्यांनी पंचनाम्यावरील अ. क्र. १ वरील निशाणी २४ ची सही त्यांची असल्याचे ओळखले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु आरोपीविरुध्द कोणताही पुरावा पटलावरती आलेला नाही.

९. सा. क्र. २ विजय मधुकर बोर्डे, सा.क्र. ०३ बापु छगन कोलते, सा. क्र. ०४ अरुण बन्सी कोलते यांनी सरतपासामध्ये अभिकथन केले आहे की, ते फिर्यादीला ओळखतात व तो मयत झाला आहे. दि. २९.०९.२०१२ रोजी काय काय घटना घडली होती हे त्यांना माहित नाही. त्यांनी आरोपीने फिर्यादी बाबासाहेब याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्यामुळे फिर्यादी खाली पडला व त्याला दगड लागला व तो जखमी झाला ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला होता. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु आरोपीविरुध्द कोणताही पुरावा पटलावरती आलेला नाही.

१०. सा. क्र. ०५ शिवाजी धोंडीराम साळवे यांनी सरतपासामधे अभिकथन केले आहे की, दिनांक २९.१.२०१२ रोजी ते पाथर्डी पोलीस स्टेशन येथे सहा. फौ. म्हणुन कार्यरत असताना सदर दिवशी त्यांच्याकडे गु.र.क्र. ३२१/२०१२ भा.द.वी.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ चा तपास देण्यात आला होता. तपासावेळी फिर्याद, दैनिक अहवाल आणि प्रथम खबरी अहवाल देण्यात आला होता. तपास त्यांचेकडे आल्यानंतर सर्वप्रथम कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपीचा शोध घेवून आरोपीला अटक केली. त्यानंतर दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि. क्र. ५४ तयार केला. त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. साक्षीदार विजय बोर्डे, अरुण कोलते, बापु कोलते यांचे जबाबातील साक्षांकित भाग अ अनुक्रमे निशाणी ५५ ते ५७ त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यानंतर त्यांनी

फिर्यादीचे वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांनी त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

११. सा. क्र. ०५ शिवाजी साळवे यांनी उलटतपासामध्ये मान्य केले की, त्यांनी घटनेमधील स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. फिर्यादीचे सांगणेवरुन खोटे दोषारोपपत्र दाखल केल्याचे त्यांनी नाकारले आहे.

१२. प्रस्तुत गुन्हयातील फिर्यादी बाबासाहेब म्हातारदेव कोलथे हा मयत असल्याबाबत अहवाल न्यायालयास निशाणी २६ अन्वये प्राप्त झाला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणातील सा. क्र. ०२ ते सा. क्र. ०४ यांनी देखिल फिर्याद हा मयत झाला असल्याबाबत अभिकथन केले आहे. प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ पंच सा. क्र. ०१ दिनकर याने पोलिसांनी त्याला पंचनाम्यासाठी बोलविले नसल्याचे व त्याच्या समक्ष पंचनामा केला नसल्याचे अभिकथन केले आहे. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ पंचनामा शाबित करणेस अपयशी ठरला आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र. ०२ ते ०४ यांनी देखिल ते आरोपीला ओळखत नसल्याचे व घटना काय घडली हे त्यांना माहित नसल्याचे अभिकथन केले आहे. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला मारहाण केल्याबाबत कोणताही पुरावा पटलावरती आलेला नाही.

१४. प्रस्तुत गुन्हयातील तपासी अधिकारी सा. क्र. ०५ साळवे याने दिलेल्या पुराव्यानुसार त्याने आरोपीला अटक केली व घटनास्थळ पंचनामा निशाणी ५४ तयार केला. तसेच सा. क्र. ०२ ते ०४ यांच्या जबाबातील साक्षांकित भाग अ निशाणी ५५ ते ५७ हे त्यांच्या सांगणेप्रमाणे नोंदविले असल्याचे आणि तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पण्ण झाल्याचे अभिकथन केले आहे परंतु, वर विवेचन केल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा शाबित झालेला नाही. निशाणी ५५ ते ५७ या मजकुराबाबत प्रत्यक्ष साक्षीदार क्र. ०२ ते ०४ यांनी नाकारले असल्यामुळे त्यांच्या जबाबातील साक्षांकित भाग अ हा देखिल शाबित झालेला नाही. परिणामी आरोपीने फिर्यादीस उचलून रस्त्यावर आपटले, इच्छापुर्वक दुखापत केली, त्याला शिवीगाळ करुन

प्रक्षोभित केले आणि जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत रास्तपणे कोणताही पुरावा पटलावरती आलेला नाही. त्यामूळे मी मुद्दे क्र. १ ते ४ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता–**

१५. माझे वरील विवेचनावरुन तसेच मुद्दे क्र.१ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने अभियोग पक्ष आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये निश्चित केलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जावून शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत आरोपी यांना संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे योग्य व उचित होईल. करीता मी मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी गणेश दिलीप लोहे यांना भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ नुसार शिक्षेस पात्र गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीस असे आदेशित करण्यात येते की, त्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये ७,५००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा स्वतंत्र जामीन सादर करावा. सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्यांकरता वैध राहिल.

(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.05.04 17:02:56 +0530

दिनांक – ०४/०५/२०२६ **(रविकिरण सपाटे)**
पाथर्डी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, पाथर्डी.

## भाग–क

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिनकर रामचंद्र झिंजुर्डे | घटनास्थळ पंच | निशाणी २३ |
| २. | विजय मधुकर बोर्डे | साक्षीदार | निशाणी ३३ |
| ३. | बापु छगन कोलते | साक्षीदार | निशाणी ३७ |
| ४. | अरुण बन्सी कोलते | साक्षीदार | निशाणी ३८ |
| ५. | शिवाजी धोंडीराम साळवे | तपासी अधिकारी | निशाणी ५३ |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी ५४/ सा. क्र. ५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी ५५ ते ५७/ सा. क्र. ५ | साक्षीदार विजय बोर्डे, अरुण कोलते, बापु कोलते यांचे जबाबातील साक्षांकित भाग अ |

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.05.04 17:03:00 +0530

पाथर्डी.

दिनांक – ०४/०५/२०२६

**(रविकिरण सपाटे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, पाथर्डी.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | रोहिणी आमटे, |
| न्यायालयाचे नाव | : | रविकिरण सपाटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १, पाथर्डी, जि. अहमदनगर. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०४/०५/२०२६ |